# आकाशवाणी पुणे

## प्रादेशिक वृत्त विभाग

## पुणे वृत्तांत

## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 02.02.2026** **वार- सोमवार**

---

**उपमुख्यमंत्री**

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी आज सातारा जिल्ह्यातल्या कराड इथल्या प्रितीसंगमावर यशवंतराव चव्हाण यांच्या समाधी स्थळी पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केलं. त्यानंतर सुनेत्रा पवार यांनी; दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह विमान अपघातात मृत्यूमुखी पडलेले पोलीस कर्मचारी विदीप जाधव यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचं सांत्वन केलं.

**साखरकारखानामहासंघ**

राज्यात २०६ सहकारी आणि खासगी कारखान्यांनी आतापर्यंत सुमारे ७९ लाख टन साखरेचं उत्पादन केलं असून पुढच्या दोन महिन्यांमध्ये आणखी ३० लाख टन साखरेचं उत्पादन होऊ शकतं, असा अंदाज राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे कार्यकारी संचालक प्रकाश नाईकनवरे यांनी व्यक्त केला आहे. महाराष्ट्र आणि कर्नाटकमधील गाळप हंगाम मार्चअखेर संपण्याची शक्यता असून उत्तर प्रदेशातील गाळपहंगाम मे अखेरपर्यंत सुरू राहील. त्यामुळे देशभरात ३०० ते ३१५ लाख टन साखर उत्पादित होऊ शकेल, असा अंदाजही महासंघाने व्यक्त केला आहे. देशभरात नोव्हेंबरच्या दरम्यान सुरू झालेल्या साखर हंगामात आतापर्यंत २ हजार २१९ लाख टन उसाचं गाळप झालं आहे. यातून १९३ लाख टन साखर तयार झाली आहे.

**<u>पुणे-ई-मोजणी</u>**

जमीन मोजण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या भूमी अभिलेख विभागाच्या 'ई-मोजणी व्हर्जन' दोनमध्ये अर्ज करताना नागरिकांना येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयाने नागरिकांसाठी मदत कक्ष स्थापन केला आहे. पुणे जिल्ह्यातील हवेली, मावळ, मुळशी आणि पिंपरी-चिंचवड या कार्यालयांत नागरिकांसाठी हा मदत कक्ष तयार केला आहे. मोजणी अर्ज भरण्यापासून ते प्रकरण निकाली निघेपर्यंत आवश्यक सर्व मदत या कक्षाद्वारे नागरिकांना मोफत मिळणार आहे.

**<u>संरक्षण</u>**

संरक्षण लेखा विभागातील प्रशासन आणि निर्णयप्रक्रिया अधिक सक्षम करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणालीचा वापर वाढवण्यात येत असल्याचं संरक्षण लेखा महानियंत्रक विश्वजीत सहाय यांनी सांगितलं. संरक्षण विभागाच्या राष्ट्रीय वित्त व्यवस्थापन प्रबोधिनीचा पायाभरणी समारंभ आज पुण्यात पार पडला; त्यावेळी ते बोलत होते. यावेळी लष्कराच्या दक्षिण विभागाचे प्रमुख लेफ्टनंट जनरल धीरज शेठ उपस्थित होते. नव्या प्रशिक्षण केंद्रात भारतीय संरक्षण लेखा सेवा अधिकाऱ्यांसाठी दीर्घकालीन व्यावसायिक प्रशिक्षण शक्य होणार आहे. तसंच, लष्कर, नौदल आणि हवाई दलासह संरक्षण संशोधन आणि विकास संस्था, तट रक्षक दल आणि इतर संबंधित संस्थांसाठी संरक्षण वित्तीय व्यवस्थापन अभ्यासक्रम राबवले जाणार आहेत.

**<u>धर्माधिकारी</u>**

विकसित भारताच्या उभारणीसाठी प्रत्येकाने आपल्या क्षेत्रामध्ये प्रामाणिकपणे काम केलं पाहिजे असं मत चाणक्य मंडल संस्थेचे संस्थापक अविनाश धर्माधिकारी यांनी नुकतंच पुण्यात व्यक्त केलं. नागरिक

सोशल फाउंडेशनतर्फे आयोजित करण्यात आलेल्या ‘भारत 2047 आणि मी’ या विषयावरील व्याख्यानमालेत ते बोलत होते.

**<u>बिडकर</u>**

पुणे महानगरपालिका निवडणुकीत पुणेकरांनी भारतीय जनता पक्षावर दाखवलेला विश्वास सार्थ ठरवण्यासाठी भाजपाचे सर्व नगरसेवक कटिबद्ध असून, शहराच्या सर्वांगीण विकासाला अधिक गती देण्यासाठी ठोस आणि परिणामकारक काम केले जाईल, असा विश्वास भाजपचे पुणे महापालिकेतील गटनेते गणेश बिडकर यांनी व्यक्त केला आहे.

महापालिका निवडणुकीत विजयी झालेल्या भाजप नगरसेवकांच्या गटाची नोंदणी विधान भवन इथं विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या उपस्थितीत पार पडली. यानंतर माध्यमांशी संवाद साधताना बिडकर काल बोलत होते.

**<u>पोर्शजामीन</u>**

पुण्यात २०२४मध्ये झालेल्या पोर्श अपघात प्रकरणातल्या तीन आरोपींना सर्वोच्च न्यायालयाने आज जामीन मंजूर केला. सतीश गायकवाड, आदित्य सूद आणि आशीष मित्तल अशी या तीन आरोपींची नावं आहेत. १९ मे २०२४ रोजी पुण्यात एका अल्पवयीन मुलाने मद्यधुंद अवस्थेत गाडी चालवताना धडक दिल्यामुळे दोघांचा मृत्यू झाला होता. या प्रकरणी रक्ताचा नमुना बदलणं, तसंच सहआरोपींच्या रक्ताच्या चाचण्यांसाठी आपल्या रक्ताचे नमुने देणं, हा आरोप या तिघांवर आहे.

**<u>जलतरण</u>**

पिंपरी चिंचवडमध्ये आठव्या राष्ट्रीय मास्टर स्पर्धा नुकत्याच पार पडल्या. यामध्ये जलतरण क्रीडा प्रकारात ७० वर्षांच्या पुढील पुरुष गटात रमेश जाधव यांनी एका सुवर्ण पदकासह ४ पदकांची कमाई केली. या विजयानंतर आता जपानमध्ये होणाऱ्या आंतरराष्ट्रीय मास्टर गेम्स स्पर्धेत जाधव यांनी आपला प्रवेश निश्चित केला आहे.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज किमान तापमान 14 पूर्णांक 1 दशांश अंश; तर कमाल तापमान 31 अंश सेल्सियस नोंदवलं गेलं. उद्याही तापमान साधारण असंच राहील, तसंच दुपारनंतर आकाश अंशत: ढगाळ राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**